

| वर्ष - 7 | अंक - 227 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 26 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- नवी WFI अखेर बरखास्त!
- सारा अली खान बिचारी तर..!
- 'मविआ'चा फॉर्म्युला पंधरा दिवसांत!
- राष्ट्रवादीच्या विकास कामांमुळे पिंपरी-चिंचवड 'रोल मॉडेल!

# प्रदूषणावर 'ईव्ही'ची मात्रा!

## महापालिका प्रशासनाच्या हालचाली : 'ब्लॅक स्पॉट' निश्चित करण्याचा विचार

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**शहर परिसरातील ध्वनी व हवा प्रदूषण वाढण्यास डिझेल व पेट्रोलवरील जुनी वाहने कारणीभूत आहेत. त्यामुळे, शहराच्या अतिप्रदूषित भागात अशा वाहनांना प्रवेश बंद करून केवळ इलेक्ट्रिक वाहनांनाच (ईव्ही) प्रवेश देण्याचा तसेच अशी ठिकाणे निश्चित करून त्याबाबत कार्यवाहीचा विचार महापालिका प्रशासनाने सुरू केला आहे.**



गेल्या काही महिन्यांपासून शहरातील जल, ध्वनी आणि वायू प्रदूषणाचा मुद्दा चर्चेत आला आहे. नद्यांचे प्रदूषण धोक्याच्या पातळीवर आहे. त्यांच्या प्रदूषणमुक्तीसाठी प्रशासनासह पर्यावरणप्रेमी एकवटले आहेत. दिवाळीसह लग्न समारंभासारख्या कार्यक्रमांच्यावेळी फटाक्यांचा आवाज व अन्य वेळी वाहने व विविध यंत्रांमुळे ध्वनिप्रदूषणाचा मुद्दा उपस्थित होतो. आता शहरातील हवा प्रदूषणाची पातळी कमी करण्याचा आदेश उच्च न्यायालयाने दिला आहे. त्यासाठी महापालिकेने उपाययोजना सुरू केल्या आहेत. शिवाय शहरातील तापमानही वाढत असल्याने चिंता वाढली आहे, त्यावरील उपाय-योजनांबाबत तज्ज्ञांच्या बैठकी, चर्चा सुरू आहेत.

शहरामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा (ईव्ही) वापर वाढला आहे. गेल्या काही महिन्यांपासून त्यात झपाट्याने वाढ होताना दिसत आहे. कारण, जुलै २०२१ मध्ये एकूण वाहनांच्या केवळ चार टक्के असलेली इलेक्ट्रिक वाहने जुलै २०२३ मध्ये ११ टक्क्यांपर्यंत वाढली आहेत. त्यात दुचाकी वाहनांचे प्रमाण ९० टक्के आहे. पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे ४५८ ई-बस आहेत. त्यांच्यासाठी निगडीत चार्जिंग स्टेशन उभारले आहे. ई-ऑटो रिक्षांनाही प्रोत्साहन दिले आहे. शिवाय, ईव्ही घेणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी महापालिकेने प्रोत्साहन योजनाही राबवली आहे. राज्य सरकारच्या ईव्ही धोरणानुसार २०२५ पर्यंत शहरात २३ ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारण्याचे नियोजन आहे. असे स्टेशन उभारणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्यांना मिळकतकरात सवलतही दिली जात आहे. त्याचा लाभ काही सोसायट्या घेत आहेत.

### दृष्टीक्षेपात शहराचे ईव्ही धोरण

- ईव्ही सज्ज शहर करण्यास मदत करणारी यंत्रणा २०२५ पर्यंत उभारणे
- महाराष्ट्र ईव्ही धोरण २०२१ नुसार 'ईव्ही'ची लक्ष्य पूर्ती करणे
- शहरातील ईव्ही प्रकल्प व त्यांच्या अंमलबजावणीचे निरीक्षण
- ईव्हीसाठी पायाभूत सुविधा आणि पथदर्शी प्रकल्पांचे मूल्यांकन, नियोजन
- पीएमपीच्या ताफ्यात शंभर टक्के ई-बस आणण्याचे धोरण
- शहरात ईव्ही चार्जिंग आणि बॅटरी स्वॅपिंग प्रकल्प रचना व योजनेची अंमलबजावणी
- चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर, नवीन कनेक्टेड लोड्स करणे
- मेट्रो स्थानकांच्या परिसरात ईव्हीसाठी चार्जिंग पायाभूत सुविधा विकसित करणे
- निवासी आणि व्यावसायिक जागांमध्ये ईव्ही वापरास प्रोत्साहन देणे
- आरटीओकडे ईव्हीची नोंदणी प्रक्रिया सुव्यवस्थित करणे

# ख्रिसमस 'सेलिब्रेशन विथ फुल्ल ऑफ जॉय'

## पिंशहरातील चर्च सजल्या : नाताळाच्या पूर्वसंध्येला उत्साह वाढला

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**ख्रिसमस 'सेलिब्रेशन विथ फुल्ल ऑफ जॉय'चा प्रत्यय शहरात ठिकठिकाणी आला. नाताळच्या पूर्वसंध्येपासून रंगत गेलेला जल्लोष आणि उत्साह रविवारी रात्रीपर्यंत कायम होता. चर्चबरोबरच दुकाने आणि मॉलही सजले होते. हे सेलिब्रेशन अजून दहा दिवस अशाच उत्साहात सुरू राहणार आहे.**



पिंपरी:नाताळच्या शुभेच्छा, नाताळ गोठ्यांची सजावट, केक-चॉकलेटची लयलूट, सांताक्लॉजने दिलेल्या भेटवस्तू, गिटारच्या साथीने रात्रभर सुरू असलेली 'ख्रिसमस इव्ह' आणि संगीतमय अशा वातावरणात नाताळची पूर्वसंध्या रंगून गेली. रविवारी सायंकाळी ६.३० आणि रात्री साडेनऊ वाजता चर्चमध्ये कॅण्डल लाईट सर्व्हिस सुरु झाल्याने नाताळच्या पूर्वसंध्येला चर्च परिसर गजबजून गेला होता.

शहरात जेथे सांताक्लॉज उपस्थित आहे; तेथे त्याला पाहण्यासाठी आणि त्याच्याकडून चॉकलेट घेण्यासाठी चिमुकल्यांची गर्दी झाली होती. 'जिंगल बेल्स, जिंगल बेल्स' सारखी गाणीही ऐकायला मिळत होती. खास नाताळनिमित्त बसवलेली गाणी, प्रार्थना, बायबलमधील उताऱ्याचे वाचन, नाताळचे संदेश यामुळे वातावरणाला वेगळेच धार्मिकतेचे वलय लाभले होते.

दरम्यान, नाताळचे वेध लागले की, ख्रिस्ती कुटुंबात घरी सजावट, फराळाची जोरदार तयारी सुरू होती. दोन-तीन दिवस आधीच घराघरांत आणि चर्चमध्ये येशू जन्माचा देखावा तयार केला होता. घरातील मंडळी वेळ काढून या कामात हातभार लावत होते. नाताळची पूर्वसंध्याही उत्साहात साजरी करण्याची परंपरा आहे. त्यातच यंदा तो दिवस रविवारचा असल्याने चर्चमध्ये गर्दी वाढली होती. प्रत्यक्ष नाताळच्या दिवशी सोमवारी सकाळी चर्चमध्ये येशूजन्माचा आनंद साजरा करण्यात येणार आहे. काही चर्चतर्फे गरजूंना मदत करण्यात आली. काही चर्चच्या मंडळीने दुचाकी रॅली काढून चॉकलेट वाटप केले. नाताळच्या काळात रोमन कॅथलिक चर्चमध्ये पूर्वसंध्येला ख्रिस्ती बांधव जमले. हजारो भाविक प्रार्थनेसाठी येत असल्याने काही चर्चमध्ये मराठी व इंग्रजीत प्रार्थना संदेश देण्यात आला.

### नाताळ प्रार्थना आणि गाण्यांचे कार्यक्रम

शहरातील अवर लेडी (पिंपरी), सेंट झेवियर (चिंचवड स्टेशन), इनफंट जीजस (तळवडे), दि युनायटेड चर्च ऑफ क्राइस्ट (कामगार नगर), सेंट जोसेफ (निगडी), केडीसी चर्च (काळेवाडी), सेंट अँथनी चर्च (निगडी प्राधिकरण), कॉन्व्हेंट हिंदुस्तानी चर्च (पिंपरी गाव) आदी चर्चमध्ये सोमवारी सकाळी आठ वाजता नाताळ प्रार्थना आणि गाण्याचे कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

# पुण्याच्या कारभारी पदावरून कोल्डवॉर!

## » दोन दादांमधील तिढा सुटला? डीपीडीसी बैठकीत निधीवाटपाचे सूत्र ठरले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्याचे कारभारी कोण, यावरून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि तत्कालीन पालकमंत्री व उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यातील शीतयुद्ध मिटल्याची चिन्हे दिसत आहेत. जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत (डीपीडीसी) महायुतीतील पक्षांच्या आमदारांना निधीचे वाटप करण्यासाठी सूत्र ठरवले जाईल. त्यासाठी चंद्रकांत पाटील यांच्याशी चर्चा केली आहे, अशी माहिती पालकमंत्री अजित पवार यांनी दिली. या वादात गेले काही महिने रखडलेली विकासकामे मार्गी लागून आचारसंहितेपूर्वी विकासकामांना सुरुवात होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.**





उपमुख्यमंत्री पवार आणि चंद्रकांत पाटील यांच्यातील शीतयुद्धात जिल्ह्यातील विकासकामे रखडली आहेत. जिल्हा नियोजन मंडळाच्या मे महिन्यातील बैठकीतील ४०० कोटी रुपयांच्या विकासकामांना अद्यापपर्यंत मंजुरी मिळालेली नाही. तत्कालीन पालकमंत्री पाटील यांनी त्या वेळी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार केली होती. या राजकारणात जिल्हा प्रशासनालाच मुख्यमंत्र्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले होते. गेल्या सहा महिन्यांत विकासकामांचा खर्च वाढून एक हजार कोटी रुपयांच्या घरात पोहोचला आहे.

अजित पवार राज्याच्या सत्तेत सहभागी होण्यापूर्वी मे महिन्यात जिल्हा नियोजन मंडळाची बैठक झाली होती. या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार उपस्थित होते. या वेळी सुमारे ४०० कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली. या बैठकीचे इतिवृत्त एक जुलै रोजी जिल्हा प्रशासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले. मात्र, दोन जुलै रोजी अजित पवार उपमुख्यमंत्री म्हणून सत्तेत सहभागी झाले. तेव्हापासून ते इतिवृत्त आतापर्यंत जिल्हा प्रशासनाकडे मंजुरीअभावी रखडले आहे. या प्रस्तावांना अजित पवारांचा आशीर्वाद नसल्याने ही कामे प्रलंबित असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यानंतर काही दिवसांत पुण्याच्या पालकमंत्रिपदासाठी दोन्ही पक्ष आग्रही होते. पालकमंत्रिपद मिळेपर्यंत पुण्यात ढवळाढवळ न करण्याची पवार यांची भूमिका होती. मात्र, पद मिळाल्यानंतरही हा तिढा सुटला नव्हता. अखेरीस सहा महिन्यांनंतर का होईना, अजित पवार यांनी चंद्रकांत पाटील यांच्याशी संपर्क साधला असून, याबाबतचा निर्णय घेतला असल्याचे समजते.

> “ महाराष्ट्रात ३६ जिल्हे आहेत. निधीवाटपाबाबत वेगवेगळ्या भागात सूत्र ठरविले असून, त्याप्रमाणे होईल. सोलापूरला तत्कालीन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सूत्र ठरविले होते. तीन पक्षांना कशा पद्धतीने निधी द्यायचा, तशाच प्रकारचे सूत्र मी ठरविले आहे. त्याबाबत चंद्रकांत पाटील यांच्याशी चर्चा झाली असून, आपल्याला खमंग बातम्या मिळणार नाहीत, याची काळजी घेतली जाईल.
>
> –अजित पवार, पालकमंत्री

### महाविकास आघाडीमुळे मराठा समाजाचे नुकसान; मंत्री चंद्रकांत पाटील यांची टीका

» महाविकास आघाडीमुळे मराठा समाजाचे प्रचंड नुकसान झाले, अशी टीका मराठा आरक्षणासंबंधीच्या मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली. म. टा. प्रतिनिधी, पुणे : ‘महाविकास आघाडीला मराठा आरक्षणाची कायदेशीर लढाई लढण्यात स्वारस्य नव्हते. त्यामुळे मराठा समाजाचे प्रचंड नुकसान झाले,’ अशी टीका मराठा आरक्षणासंबंधीच्या मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली. ‘महायुती’ सरकार मराठा आरक्षणाची पुनर्विचार याचिका पूर्ण ताकदीनिशी लढवेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारने दाखल केलेल्या पुनर्विचार याचिका स्वीकारल्याच्या पार्श्वभूमीवर पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. ‘सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय आनंददायी असून, या याचिकेमुळे मराठा समाजाचे विविध कारणाने झालेले मागासलेपण सिद्ध करून, त्यांना आरक्षण मिळवून देण्याची आशा निर्माण झाली आहे. राज्य सरकार आता वकिलांची मोठी फौज उभी करून ही याचिका पूर्ण ताकदीनिशी लढवेल; तसेच मराठा समाजाला हक्काचे आरक्षण मिळवून देईल,’ असे ते म्हणाले.

---

# फुलेवाडा, सावित्रीबाई फुले स्मारक जोडण्याचे अजित पवारांचे सूतोवाच!

## » पावणेचार एकरांत उभारणार स्मारक?

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महात्मा फुले वाडा आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक हे एकमेकांना जोडून पावणेचार एकर जमिनीवर जागतिक दर्जाचे स्मारक तयार करण्याचे सूतोवाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी केले. या दोन्ही वाड्यांमधील वस्ती आणि घरांचे स्थलांतर करून दोन्ही स्मारके एकमेकांना जोडण्याचे नियोजन आहे. स्थानिकांनीही त्यास सहमती दर्शवल्याचे पवार यांनी सांगितले..**



पवार यांनी भिडे वाड्याच्या जागेची पाहणी केली. महापालिका प्रशासनाने डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार भिडेवाड्याचा कायदेशीर ताबा घेऊन, तेथील बांधकाम पाडले होते. त्या जागेची पाहणी पवार यांनी केली. त्यानंतर त्यांनी समताभूमी येथील महात्मा फुले वाड्याला भेट दिली. या वेळी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, पुणे महपालिकेचे आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) शहराध्यक्ष दीपक मानकर, प्रदीप देशमुख आदी उपस्थित होते.

पवार म्हणाले, 'महात्मा फुले वाडा आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक एकत्रित करून भव्य स्मारक उभारावे, असा आमचा प्रयत्न आहे. या ठिकाणी पावणेचार एकर जमिनीवर जागतिक दर्जाचे स्मारक उभारणे शक्य आहे. या ठिकाणी फिरताना स्थानिकांनाही या दोन्हीही जागा एकमेकांना जोडल्या जाणार असल्याची कल्पना आहे. त्यास कोणाचा विरोध नाही. मात्र, स्थानिकांसाठी पर्यायी रस्त्याचे नियोजन करावे लागणार आहे.'

### भिडे वाड्याचीही पाहणी

» 'भिडे वाडा येथे जागेची मर्यादा लक्षात घेऊन तज्ज्ञांशी चर्चा करून स्मारकाचा आराखडा तयार करण्यात येईल. पुढच्या पिढीला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य लक्षात रहावे आणि याठिकाणी मुलींची पहिली शाळा सुरू झाली हे कळावे, या पद्धतीने सर्व स्मारकाची रचना करण्याचा प्रयत्न आहे. बाहेरून पुरातन वास्तू दिसावी आणि आतील बाजूस विद्यार्थीनी आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सर्व सुविधा असाव्यात, असा प्रयत्न राहील. वाहनतळासाठीही व्यवस्था करण्याबाबत परिसरातील जागेचा उपयोग करता येतो, का याबाबतही विचार सुरू आहे,' असे पवार यांनी सांगितले.

### नागरिकांची सहमती, पण...

» या एकत्रित स्मारकासाठी अनेक कुटुंबांचे स्थलांतर करावे लागणार आहेत. यापूर्वी प्रशासनाने काही कुटुंबाचे स्थलांतर केले आहे. पाहणी करीत असताना अजित पवार यांना काही स्थानिक नागरिक भेटले. त्यांनी स्थलांतर करण्यास सहमती दर्शवली. मात्र, आमचे पुनर्वसन चांगले आणि जवळच्या परिसरातच व्हावे, आम्हाला वाऱ्यावर सोडू नये, अशी इच्छा नागरिकांनी व्यक्त केल्याचे पवार यांनी सांगितले. तसेच, या ठिकाणी जागा मालक आणि भाडेकरू अशीही व्यवस्था आहे. त्यामुळे मालक आणि भाडेकरू या दोघांचेही समाधान करावे लागणार आहे. या दोघांचीही पर्यायी व्यवस्था करून हे दोन्ही भाग जोडण्याचा सरकारचा मनोदय आहे, असे पवार या वेळी म्हणाले.

# राष्ट्रवादीच्या विकास कामांमुळे पिंपरी-चिंचवड 'रोल मॉडेल!

## » युवक राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांची भावना

## » शहर युवक कार्यकारिणीचा नियुक्तीपत्र वाटप समारंभ उत्साहात

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या माध्यमातून केलेल्या विकास कामांमुळे पिंपरी-चिंचवड विकासाचे 'रोल मॉडेल' झाले आहे. अजित पवार यांचे या शहरावर विशेष प्रेम असून, त्याला साजेसे युवक संघटन उभे राहील, असा विश्वास युवक राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी व्यक्त केला.**




पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादीचे युवक शहराध्यक्ष शेखर काटे यांच्या पुढाकाराने शहर कार्यकारिणीचा पद नियुक्तीपत्र वाटप आयोजित युवक मेळाव्यामध्ये करण्यात आले.

यावेळी शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, महिला अध्यक्ष कविता आल्हाट, माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, शाम लांडे, राजेंद्र जगताप, संगीता ताम्हाणे, युवक प्रदेश उपाध्यक्ष विशाल वाकडकर, सरचिटणीस विशाल काळभोर, युवती शहराध्यक्षा वर्षा जगताप, श्याम जगताप, ॲड. गौरव लोखंडे, विनायक रणसुंभे, शोभा पगारे, युवक राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रसन्न डांगे, तुषार ताम्हाणे, प्रसाद कोलते आदी मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसेच्या चिंचवड विधानसभा अध्यक्ष प्रतिक साळुंखे, पिंपरी विधानसभा अध्यक्ष अक्षय माछरे, भोसरी विधानसभा अध्यक्ष सागर बोराटे, मुख्य संघटक प्रशांत सपकाळ, प्रवक्ते भागवत जवळकर, चेतन फेंगसे यांच्यासह एकूण ७५ जणांची जंबो कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांचे पदवाटप करण्यात आले.

शहराध्यक्ष अजित गव्हाणे म्हणाले की, तरुणांचा देश म्हणून जगभरात भारताची ओळख आहे. त्यामुळे देशाला उज्वल भविष्य आहे. तरुणांच्या माध्यमातून समाजातील तरुणांचे समाजातील विविध घटकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपल्याला पुढाकार घ्यायचा आहे. मिळालेल्या पदाचा उपयोग समाजासाठी करावा, असे आवाहनही गव्हाणे यांनी केले.

सूत्रसंचालन दिपक साकोरे यांनी केले. प्रस्तावना शहराध्यक्ष शेखर काटे यांनी केली.

> “ पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने युवा संवाद सारखा उपक्रम हाती घेण्यात आला असून, शहराच्या चारही कोपऱ्यामध्ये युवकांपर्यंत पोहोचण्याचा आमचा संकल्प आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेली विकास कामे आणि राष्ट्रवादीचे महत्त्वकांक्षी निर्णय लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी युवकांची तगडी फळी निर्माण करण्याचा आमचा निर्धार आहे.
>
> **- शेखर काटे, शहाराध्यक्ष,**
> राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी, पिंपरी-चिंचवड..

### अजित पवारांनी निर्णय घेतला; तर चुकलं काय? : सुरज चव्हाण

» राष्ट्रवादी काँग्रेसने 2019 मध्ये भारतीय जनता पार्टीच्या विरोधात निवडणूक लढवली होती. त्यावेळी आपण शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर वेगवेगळी टीका केली होती. त्यांनीही आपले नेतृत्वावरती खालच्या पातळीवर जाऊन टीका केली होती. तरीही राज्याच्या विकासाचा विचार करून आपण "कॉमन मिनिमम प्रोग्राम" तयार केला. स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या कट्टर हिंदुत्ववादी शिवसेना सोबत आपण सत्तेत बसलो. शरद पवार साहेबांनी निर्णय घेतला. आपण त्यांच्या पाठीशी राहिलो. ज्यावेळी अजितदादांनी निर्णय घेतला. त्यावेळी तुम्ही म्हणणार विचार सोडला. ही भावना म्हणजे "आमचं ते प्रेम आणि तुमचं ते लफडं..." अशी आहे, अशी घणाघाती टीका सुरज चव्हाण यांनी केली.

---

# तर भारत महासत्ता अन् विश्व गुरू होईल!

## » पद्मश्री गिरीश प्रभुणे : एच. ए. स्कूल चे हीरक महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मेकॉलेची शिक्षण पद्धती ही ब्रिटिशांचे अनुकरण करणारी आणि गुलाम घडवणारी आहे. या शिक्षण पद्धतीमुळे भारताच्या संस्कृती आणि जुन्या परंपरेवर आक्रमण झाले आहे. यामध्ये बदल करण्याची नितांत गरज आहे. भारताला मेकॉलेच्या शिक्षण पद्धतीतून बाहेर काढण्यासाठी नव्या शिक्षण पद्धतीचा अवलंब केला, तरच भारत महासत्ता आणि विश्वगुरू होईल. या शिक्षण व्यवस्थेत खूप दोष आहेत. आपल्याला पुन्हा समृद्ध भारत घडवायचा आहे. त्यासाठी गुलाम घडवण्याऐवजी नव्या शिक्षण पद्धतीतून 'माणूस' घडविला पाहिजे असे प्रतिपादन पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनी केले.**



पिंपरी-चिंचवड शहरातील नामांकित हिंदुस्थान अँटिबायोटिक्स स्कूलची स्थापना २० जुलै १९५८ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते झाली होती. शाळेच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन शुक्रवारी प्रभुणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे, सचिव धनंजय कुलकर्णी, मिलिंद कांबळे, डॉ. शरद आगरखेडकर, डॉ. सविता केळकर, शाळा समिती अध्यक्ष खेमराज रणपिसे, मुख्याध्यापक सुनील शिवले, उपमुख्याध्यापिका दीपा अभ्यंकर, आणि हिंदुस्थान अँटिबायोटिक्स स्कूल माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष शशांक परमाणे, उपाध्यक्ष गणेश गांवकर, सचिव आशिष म्हसे, समन्वयक मोहन बाबर, अशोक थोरात, विद्यार्थी प्रतिनिधी निखिल साबळे, आर्या मोटे, शिक्षक प्रतिनिधी रमेश गाढवे, उप कार्याध्यक्ष श्वेता नाईक, पालक शिक्षक संघ उपाध्यक्ष समाधान गेजगे आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, माजी विद्यार्थी उपस्थित होते.

### गुणवंत माजी विद्यार्थ्यांचा गौरव...

**»कला, विज्ञान, शैक्षणिक प्रदर्शनाचे उद्‌घाटन उद्योजक जयदेव अक्कलकोटे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच प्राथमिक विभागाचे पारितोषिक वितरण माजी विद्यार्थी व कामगार नेते डॉ. कैलास कदम आणि माध्यमिक विभागाचे पारितोषिक वितरण उद्योजक अक्कलकोटे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मागील काळात शाळेच्या विकासात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आजी-माजी शिक्षक आणि समाजाच्या विविध क्षेत्रात, केंद्र आणि राज्य सरकारमध्ये, शिक्षण, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य, पर्यावरण, राजकारण, कामगार अशा विविध क्षेत्रात ज्या माजी विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळविला आहे. त्यांचा प्रभुणे यांच्या हस्ते स्मृती चिन्ह, शाल, श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.**



## भूमिका

# जागावाटपच कळीचे!

**दिल्लीत 'इंडिया'ची बैठक झाल्यापासून कटकथा (कॉन्स्पिरसी थिअरीज) रचल्या जात आहेत. इंडियाचा पंतप्रधान पदाचा चेहरा कोण असेल यासंदर्भात बैठकीआधी तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांचे नाव घेतले जात होते. तीन दिवस ठाण मांडून बसलेल्या ममतांनीही नेत्यांच्या लॉबिइंगला अप्रत्यक्ष पाठिंबा दिला होता.**

मात्र बैठकीत अचानक ममता आणि आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला. या दोन नेत्यांनी असे का केले असावे, या मुद्दयावर सध्या खल सुरू आहे. खरगेंच्या नावावर काँग्रेसने उघडपणे कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. अर्थात त्यात फारसे नवल नाही. खरगे पक्षाध्यक्ष असले तरी त्यांच्याभोवती राहुल गांधींचे निष्ठावान आहेत. राहुल गांधींचे नाव पुढे करायचे असेल तर हे नेते उघडपणे प्रतिक्रिया देणार नाहीत हे ओघाने आलेच! पण, तीन आठवडयांपूर्वीच खरगेंच्या आत्मचरित्रात्मक पुस्तकाच्या प्रकाशनावेळी, 'खरगे योग्य वेळी काँग्रेसचे पक्षाध्यक्ष झाले,' असे म्हणत सोनिया गांधींनी जाहीरपणे खरगेंना पाठिबा दिला. त्या कार्यक्रमामध्ये 'माकप'चे महासचिव सीताराम येचुरी, राष्ट्रीय जनता दलाचे नेते मनोज झा, 'द्रमुक'चे टी. आर. बालू या नेत्यांनीही खरगे हेच 'इंडिया'चे पंतप्रधान पदाचे चेहरे होऊ शकतात, असे सूचित केले होते. त्यामुळे 'इंडिया'च्या बैठकीमध्ये



खरगेंचे नाव सुचवले गेले तेव्हा खरे तर आश्चर्य वाटण्याजोगे काही नव्हते. तरीही कटकथा का फिरू लागल्या आहेत?

काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी जनता दलाचे (सं) प्रमुख नितीशकुमार यांच्याशी संवाद साधल्यापासून 'इंडिया'मध्ये काही तरी बिनसले असल्याची चर्चा केली जात आहे. त्याचा संबंध ममतांच्या प्रस्तावाशी जोडला जाऊ लागला आहे. खरगेंचे नाव घेतल्यामुळे नितीशकुमार नाराज असल्याचे बोलले जात आहे. एका कटकथेनुसार ममता आणि केजरीवाल भाजपच्या दबावाखाली काँग्रेसचा बळी देत असल्याचे सांगितले जाते. मोदींविरोधात खरगेंचा चेहरा असेल तर दक्षिण-उत्तर विभाजन होऊन भाजपला त्याचा उत्तरेत दणदणीत लाभ मिळेल असे मानले जात आहे. खरगेंच्या नावावर शिक्कामोर्तब झाले की, नितीशकुमार पंतप्रधान पदाच्या स्पर्धेतून बाहेर होतील. मोदीविरोधात लढण्यासाठी हिंदी पट्टयातील नेता हवा, तो नितीशकुमारच असू शकतील, ही कटकथेतील उपकथा आहे. या कथा-उपकथेत आणखी एक पिल्लू ममतांनीच सोडून दिलेले आहे. वाराणसीमध्ये मोदींविरोधात प्रियंका गांधी-वाड्रा 'इंडिया'कडून योग्य उमेदवार ठरू शकतील असाही मुद्दा 'इंडिया'च्या बैठकीत उपस्थित झाला होता. 'इंडिया'च्या बैठकीनंतर महाआघाडीतील नेत्यांनीच गोंधळ उडवून दिला आहे. त्यामुळे कथा-उपकथा रचल्या जात आहेत. पण, खरा मुद्दा जागावाटपाचा असून 'इंडिया'मध्ये याच मुद्दयावरून गदारोळ चालू आहे.

### दोन आठवडे लांबणीवर?

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपची आखणी झाली असून पक्षाने दोन दिवसांची राष्ट्रीय बैठक घेऊन पदाधिकाऱ्यांना कामाला लागण्याचा आदेश दिला आहे. 'इंडिया'ला मात्र विधानसभा निवडणुकीतील पराभव बाजूला ठेवून लोकसभा निवडणुकीचा विचार करावा लागणार आहे. घोडामैदान चार महिन्यांवर आल्यामुळे 'इंडिया'च्या घटक पक्षांना एकत्रितपणे भाजपविरोधात रणनीती तयार करावी लागणार आहे. पण, जागावाटपाचा प्रश्न सुटल्याशिवाय 'इंडिया'तील घटक पक्ष एकत्र येऊ शकणार नाहीत, त्यांचे मतभेद मिटवू शकणार नाहीत हे दिल्लीतील बैठकीनंतर स्पष्ट झालेले आहे. बैठकीमध्ये ममता बॅनर्जी आणि अरविंद केजरीवाल यांनी जागावाटपाबाबत निर्वाणीचा इशारा दिलेला होता. ३१ डिसेंबपर्यंत जागावाटप झालेच पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. एका आठवडयामध्ये राज्या-राज्यांतील जागांबाबत सामंजस्य होण्याची शक्यता नाही. त्यामुळे जानेवारीच्या दुसऱ्या आठवडयापर्यंत जागावाटपाचा तिढा सोडवण्याचा काँग्रेसचा प्रयत्न राहील.

### काँग्रेसने 'इंडिया'तील घटक

पक्षांशी जागावाटपावर तोडगा काढण्यासाठी पाच सदस्यांची समिती नियुक्त केलेली आहे. त्यामध्ये अशोक गेहलोत आणि भूपेश बघेल हे कसलेले नेते आहेत. ही समिती प्रदेश काँग्रेसमधील नेत्यांशी बोलून पक्षासाठी किती जागांवर दावा करायचा याचा अंदाज घेईल. या समितीची शनिवारी पहिली बैठक मुकुल वासनिक यांच्या निवासस्थानी झाली. प्रदेश काँग्रेसच्या चर्चेचा पहिला टप्पा पार पाडल्यानंतर ही समिती 'इंडिया'तील घटक पक्षांशी जागावाटपासाठी वाटाघाटी करेल. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगढ या तीनही राज्यांमध्ये काँग्रेसचा पराभव झाल्यामुळे लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसला तडजोड करावी लागेल. त्यासाठी प्रादेशिक पक्ष काँग्रेसवर दबाव आणू लागले असल्याचे दिसते.

## संपादकीय »

# दिव्याखालचा अंधार

***पोलादी पंजे असणाऱ्या केंद्र सरकारला देशातील सारे लोकप्रतिनिधी जिथे जमतात, नव्या कायद्यांना जन्म देतात आणि देशातील जनतेच्या वेदना वेशीवर टांगतात; ते संसद भवन सुरक्षित राखता येऊ नये, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे***

अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार असताना २२ वर्षांपूर्वी संसदेवर पाकिस्तानी दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार दहशतवाद, नक्षलवाद, फुटीर चळवळी आणि दंगलखोर यांच्या विरोधात कठोर कारवाई करीत असल्याचे दाखले उठल्याबसल्या दिले जातात. याबाबत सरकार किती कठोर आहे, हे सांगण्यासाठी लोहपुरुष सरदार पटेल यांचे नाव असंख्यवेळा घेतले जाते. अशा या 'पोलादी पंजे' असणाऱ्या केंद्र सरकारला देशातील सारे लोकप्रतिनिधी जिथे जमतात, नव्या कायद्यांना जन्म देतात आणि देशातील जनतेच्या वेदना वेशीवर टांगतात; ते संसद भवन सुरक्षित राखता येऊ नये, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. खरेतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच संसदेत येऊन या प्रकरणी निवेदन करण्याची आवश्यकता होती.

**सरत्या वर्षांच्या अखेरच्या सोमवारी भांडवली बाजार उसळण्याची शक्यता असताना आर्थिक इशाऱ्यांची जाणीव करून देणे शहाणपणाचे नाही; हे खरे. पण त्यास इलाज नाही. विशेषत: आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारखी संघटना जेव्हा भारताच्या वेगाने वाढत्या सार्वभौम कर्जाविषयी- म्हणजे सरकारने घेतलेल्या कर्जाविषयी- इशारा देत असेल तर त्याची दखल न घेणे व्यवसायाशी प्रतारणा करणारे ठरेल.**

# कर्जे काढू या!

या इशाऱ्यांची दखल घेणे आणखी एका कारणासाठी इष्ट ठरते. कारण हीच नाणेनिधी संघटना जेव्हा भारताविषयी बरे काही बोलते तेव्हा आपले राज्यकर्ते त्या कौतुकाच्या माळा गळयातून काढण्यास तयार नसतात. भारतास वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असे ही संघटना वा जागतिक बँक यांपैकी कोणी म्हटले रे म्हटले की आपणास कोण स्फुरण चढते. मग समाजमाध्यमी 'अर्थ'वटराव ही वक्तव्ये जमेल तितकी 'व्हायरल' कशी करता येईल या प्रयत्नांस लागतात. त्यांत त्यांचीही चूक नाही म्हणा. 'वरिष्ठ सांगतील ते ऐकायचे' असे संस्कार बालवयातच झाले की तेच आयुष्यभर सवयीचे होते. त्यामुळे वरिष्ठांस जे जे अप्रिय त्याकडे दुर्लक्ष करणे ओघाने आलेच. या अशांची संख्या वाढती असल्याने नाणेनिधीने दिलेल्या इशाऱ्याकडे लक्ष वेधणे आवश्यक ठरते.

भारत सरकारच्या डोक्यावरील कर्ज झपाटयाने वाढत असून लवकरच त्याचा आकार देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाइतका होईल, असा इशारा नाणेनिधीचा वार्षिक अहवाल देतो. नाणेनिधीच्या सदस्य देशांशी झालेल्या



करारानुसार ही संस्था वेळोवेळी संभाव्य आर्थिक आव्हानांची कल्पना देत असते. सदर इशारा हा त्या संदर्भातील अहवालाचा भाग आहे. हा इशारा देणारी व्यक्ती भारताविषयी असूया असलेली कोणी गौरवर्णीय नाही, हे लक्षात घेतलेले बरे. अर्थात सांप्रति सरकारवर कोणतीही आणि कितीही रास्त टीका करणारी व्यक्ती ही देशद्रोही ठरवली जात असल्याने नाणेनिधीवरील बंदीची मागणी पुढे येणारच नाही; असे नाही. तो धोका पत्करून नाणेनिधी हा इशारा देते त्यावरून त्याचे गांभीर्य लक्षात यावे. देशाच्या डोक्यावरील कर्ज सन २०२८ पर्यंत सकल राष्ट्रीय उत्पन्नाइतके होईल हे आणीबाणीकालीन भाकीत आहे, असेही नाणेनिधी लगेच स्पष्ट करते. याचा अर्थ असा की जागतिक अर्थव्यवस्थेसमोर सध्याची आव्हाने अधिक गहिरी झाली तर या परिस्थितीस सामोरे जाण्यासाठी देशोदेशांस विविध उपाय योजावे लागतात. कर्ज काढणे हा त्यातील एक. या कर्जात अचानक काही कारणांनी वाढ झाल्यास हे कर्ज १०० टक्क्यांवर जाईल, असा नाणेनिधीच्या इशाऱ्यांचा अर्थ. आंतरराष्ट्रीय पातळीवर अर्थसंकटाइतकेच, किंबहुना त्यापेक्षाही अधिक मोठे आव्हान आहे ते पर्यावरण बदलाचे. नाणेनिधीचा अहवाल हे नमूद करतो.

या पर्यावरणीय बदलांमुळे सध्याच जे उत्पात होत आहेत ते अधिक मोठया प्रमाणावर होऊ लागल्यास- आणि ते तसे होतील असे दिसत असताना- निर्माण होणाऱ्या परिस्थितीस सामोरे जाण्यासाठी सरकारांस अधिक खर्च करावा लागेल. या अशा आकस्मिक खर्चाची तरतूद पुरेशी नाही. अशा तरतुदीशिवाय मोठे खर्च कारण उद्भवल्यास व्यक्तीप्रमाणे देशांसही कर्जे घेण्याखेरीज पर्याय राहात नाही. नाणेनिधीचा अहवाल याचीच जाणीव करून देतो.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ‘मविआ’चा फॉर्म्युला पंधरा दिवसांत!

## राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांची माहिती

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या महाविकास आघाडीतील तीन पक्षांच्या लोकसभेच्या जागा वाटपाचा ‘फॉर्म्युला’ अद्याप जाहीर केला नाही. मात्र, दिल्लीत सोनिया गांधी, राहुल गांधी, शरद पवार तसेच उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांची या विषयावर सविस्तर चर्चा झाली आहे. त्यामुळे पंधरा दिवस थांबा, ‘मविआ’चा फॉर्म्युला लवकरच समजेल, असे राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले.**



पुण्यात बिबवेवाडी येथे एका कार्यक्रमासाठी त्या आल्या होत्या. कार्यक्रमानंतर त्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या. संजय राऊत यांनी लोकसभेच्या शिवसेना २३ जागा लढविणार असल्याचे भाष्य केले होते. त्याच संदर्भ देऊन सुप्रिया सुळे यांना विचारता त्यांनी त्यावर उत्तर दिले. ‘तुम्ही त्याची चिंता करू नका. आम खाओ, पेड मत गिनो’, अशा शब्दांत खासदार सुप्रिया सुळे यांनी त्यावर अधिक भाष्य करण्यास नकार दिला.

### कॅबिनेटमध्ये गँगवार?

‘या राज्य सरकारच्या कॅबिनेटमध्ये अक्षरशः गँगवार झाला आहे. त्यामुळे कॅबिनेटमध्ये कोणी बोलत नाही. कोणाचे ऐकले जात नाही. छगन भुजबळांसारख्या वरिष्ठ मंत्र्यांचे कॅबिनेटमध्ये कोणी ऐकतच नाही हे स्पष्ट आहे. त्यांचा मान सन्मान ठेवला जात नाही. हे दुर्दैव आहे. ज्या गोष्टींची कॅबिनेटमध्ये चर्चा व्हायला हवी त्या गोष्टी महाराष्ट्राच्या ज्येष्ठ मंत्र्यांना मिडियाला बाहेर येऊन बोलावे लागते. त्यावरून संजय राऊत म्हणतात, त्याप्रमाणे कॅबिनेटमध्ये गँगवार सुरू आहे. सरकारला प्रशासन चालवायचे नाही. पक्ष फोडायचे, घर फोडायचे आणि सगळ्यांना भीती दाखवायची आणि मनमानी करायची सर्वसामान्य माणूस भरडला गेला तरी चालेल हे मात्र सत्तेत राहिले पाहिजे,’ अशी टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.

### चर्चेच्या मागणीमुळे निलंबन

बारामतीत लोकसभेला योग्य तो उमेदवार देणार, असे अजित पवार म्हणाले. त्यावर सुप्रिया सुळे म्हणाल्या, ‘माझ्यासाठी ही लोकशाही आहे. दडपशाही दिल्लीत चालते. दिल्लीत आणीबाणी चालली आहे. चार कायदे पास केले. कांदा, शेतकरी तसेच जम्मू काश्मीर, मणीपूर, तसेच पूँछमधील हल्ल्याच्या प्रश्नावर आम्ही चर्चा व्हावी, अशी मागणी करीत होतो. संसदेत कायदे मान्य करण्यासाठी आणीबाणी करीत आम्हाला निलंबित करण्यात आले. संसदेच्या इतिहासात प्रथमच दीडशे खासदार निलंबित झाले. ही आणीबाणी नाही तर काय आहे,’ असे सांगून ही अघोषित आणीबाणी आहे,’ अशीही टीका सुळे यांनी केली. लोकशाही टिकविण्यासाठी आम्हाला सक्षमपणे काम करावे लागेल. त्यामुळे आम्ही लोकशाही पद्धतीने निवडणुका लढविणार असून बारामतीत कोणीही उमेदवार येऊ दे. ती लोकशाही आहे, असे सांगायला त्या विसरल्या नाहीत.

### गृहमंत्र्यांचे अपयश

‘नागपूरला क्राईम रेट वाढतो, जालन्यात लाठी हल्ला होतो तसेच पुण्यात ड्रग्ज रॅकेट सापडते,’ या प्रश्नावरून सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. या सर्व घटनेला गृहमंत्री फडणवीस जबाबदार आहेत, अशा शब्दांत त्यांनी टीकास्त्र सोडले.

### मतभेद आहेत, मनभेद नाही

» अजित पवार गटाकडून बारामतीत उमेदवार कोण असा प्रश्न विचारताच, ‘अजित पवार गट नाही. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून असे म्हणा,’ अशा शब्दांत अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर पुन्हा एकदा दावा केला आहे. त्याबाबत विचारता सुप्रिया सुळे म्हणाल्या, ‘राष्ट्रवादी कोणाची आहे याबाबत सध्या निवडणूक आयोग तसेच सर्वोच्च न्यायालयात सुनावणी आहे. त्याचा निकाल लागल्यावर कळेल.’ ‘आमच्याकडे लोकशाही आहे. दडपशाही नाही. कोणाच्याही घरात मतभेद होतात. मोकळा श्वास घेऊन प्रश्न उपस्थित करू शकतो. ‘इंडिया’ आणि ‘मविआ’ हे लोकशाहीने चाललेले आहे. त्यानुसार आमच्या कुटुंबांमध्ये चर्चा होते. भीती दाखविली जात नाही. म्हणून मतभेद झाले म्हणजे मनभेद आहे असे नाही, अशा शब्दांत अजित पवार यांच्याशी मनभेद नसल्याचे सुळे यांनी स्पष्ट केले.

---

# हिवाळ्यात धुक्यात ही रेल्वे गाड्या सुसाट धावणार

## मध्य रेल्वेकडून उपाययोजना, धुके सुरक्षा यंत्रणा ठरणार गेमचेंजर

। मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**धुक्याच्या वातावरणातील अडचणी दूर करण्यासाठी मध्य रेल्वेने ५०० धुके सुरक्षा यंत्रणा (फॉग सेफ्टी डिव्हाईस) खरेदी करून सर्व विभागांना वाटप केले आहे. तसेच, नव्याने तेवढ्याच यंत्रणांचा प्रस्ताव पाठविला आहे. या यंत्रणेमुळे सिग्नल दृश्यमानता कमी असताना रेल्वे चालकांना सिग्नलबाबत सर्व माहिती मिळणार आहे. त्यामुळे धुके असताना देखील गाड्यांचा वेग कमी होणार नाही.**



हिवाळ्यात दाट धुके पडल्यानंतर दृश्यमानता कमी झाल्यामुळे रेल्वेच्या वेळापत्रकावर परिणाम होतो. रेल्वे गाड्या ३० ते ६० प्रतितास वेगाने चालवाव्या लागतात. काही दिवसांपूर्वीच पुणे विभागाला याचा अनुभवर आला होता. पहाटे दोन ते सकाळी सात दरम्यान दाट धुके पडल्यामुळे अनेक रेल्वे गाड्यांना उशीर झाला होता.

यावर पर्याय म्हणून मध्य रेल्वेने धुके सुरक्षा यंत्रणा खरेदी केली आहे. त्याचे विभागानुसार वाटप केले आहे.

त्यानुसार सध्या पुणे विभागाला अशा प्रकारची दहा यंत्रणा मिळाल्या आहेत. तसेच, नव्याने १८० ची मागणी करण्यात आली आहे.

धुक्यामुळे कमी दृश्यमानतेच्या घटनांमध्ये गाड्यांचा वेग सामान्यतः ३०-६० किलोमीटर प्रतितास दरम्यान असतो. धुके सुरक्षा यंत्रणेच्या अंमलबजावणीमुळे जास्तीत जास्त ७५ किलोमीटर प्रतितास वेग मिळू शकतो. त्यामुळे गाड्यांचा खोळंबा करणारा कालावधी कमी होतो आणि वक्तशीरपणा वाढतो यामुळं रेल्वेगाड्यांना उशीर होणार नाही.

### धुके सुरक्षा यंत्रणेची वैशिष्ट्य

» जीपीएस कार्यक्षमता- धुके सुरक्षा यंत्रणा हे जीपीएस तंत्रज्ञानावर चालते. त्यामुळे रेल्वे चालकांना आगामी तीन सिग्नल्सबाबत ऑडिओ आणि चित्रित संकेतांद्वारे आगाऊ सूचना मिळते.

सिग्नलचे वर्णन आणि अंतर डिस्प्ले- हे उपकरण केवळ पुढील सिग्नलचे वर्णन दाखवत नाही तर इंजिन आणि सिग्नलमधील मध्यवर्ती अंतर देखील सूचित करते. त्यामुळे आगामी बदलांसाठी योग्य तयारी करणे शक्य होते.

अलर्ट यंत्रणा- वास्तविक स्थानाच्या ५०० मीटर अगोदर सिग्नलचे दिशा जाहीर करून, रेल्वे चालकांना त्यांच्या गाड्या सुरक्षितपणे हाताळण्यासाठी ही यंत्रणा सतर्क करते. चालकास अधिक सुसज्ज राहण्यास मदत करते.

# देशभरात 24 तासांत 656 करोनाबाधित रुग्ण!

## » सक्रीय रुग्णसंख्या 3742, महाराष्ट्रातही शंभरी पार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**देशात करोनाबाधित रुग्णाची संख्या वाढू लागली आहे. काही महिन्यांपूर्वी देशभरातील करोनाबाधित रुग्णांची संख्या खूप कमी झाली होती. त्यामुळे भारताने सुटकेचा निश्वास सोडला होता. परंतु, आता पुन्हा एकदा आरोग्य यंत्रणेचे धाबे दणाणले आहेत. एका बाजूला करोनाचा नवीन उपप्रकार जेएन.१ ने बाधित रुग्ण आढळत आहेत. तर, दुसऱ्या बाजूला दररोज शेकडो नवीन करोनाबाधित रुग्णांची नोंद होत आहे. गेल्या २४ तासांत देशात कोव्हिड-१९ चे ६५६ नवे रुग्ण आढळले आहेत. तसेच एका रुग्णाचा उपचारांदरम्यान मृत्यू झाला आहे.**

सध्या देशात ३,७४२ सक्रीय करोनाबाधित रुग्ण आहेत. यापैकी सर्वाधिक रुग्ण केरळमध्ये आहेत. केरळमध्ये गेल्या २४ तासांत १२८ नवे करोनाबाधित रुग्ण आढळले आहेत. एकट्या केरळमध्ये तीन हजार सक्रीय करोनाबाधित रुग्ण आहेत. तर कर्नाटकमध्ये २७१ सक्रीय करोनाबाधित रुग्ण आहेत. गेल्या २४ तासांत कर्नाटकमध्ये ९६ नवे रुग्ण सापडले आहेत. या यादीत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. राज्यात गेल्या २४ तासांत ३५ नवे रुग्ण सापडले आहेत. यासह राज्यात सध्याच्या घडीला १०३ करोनाबाधित रुग्ण उपचार घेत आहेत. संपूर्ण भारतात शुक्रवारी (२२ डिसेंबर) ६४० नवे करोनाबाधित रुग्ण आढळले होते. एकट्या केरळमध्ये २६५ करोनाबाधित रुग्ण सापडले होते. तसेच एका करोनाबाधित रुग्णाचा मृत्यूदेखील झाला होता. त्यापाठोपाठ शनिवारीदेखील देशभरात शेकडो नवे रुग्ण आढळले. देशभरात शनिवारी एका दिवसात ७५२ नव्या करोनाबाधित रुग्णांची नोंद झाली आणि चार करोनाबाधित रुग्णांचा मृत्यू झाला. रविवारी ६५६ नवे रुग्ण आढळले आहेत.

### धनंजय मुंडे यांना करोना

» दरम्यान, महाराष्ट्राचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनादेखील करोनाची लागण झाली आहे. त्यांनी स्वतः यांनी फेसबूकद्वारे याबाबतची माहिती दिली आहे. धनंजय मुंडे यांनी फेसबूकवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, नागपूरमधील विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर अस्वस्थ वाटू लागल्याने मी कोव्हिड-१९ ची तपासणी केली. यामध्ये मी पुन्हा एकदा कोव्हिड पॉझिटिव्ह असल्याचं आढळून आलं आहे. मला सध्या फारसा त्रास होती नाहीये, परंतु, डॉक्टरांच्या सल्ल्याने मी मागील चार दिवसांपासून क्वारन्टाईन (विलगीकरण कक्षात) राहून योग्य उपचार घेत आहे. सध्या काळजी करण्याचं कोणतंही कारण नाही. मी लवकरच बरा होऊन आपल्या सर्वांच्या सेवेत पुन्हा दाखल होईन.



## गाझातील हवाई हल्ल्यात एकाच कुटुंबातील ७६ सदस्यांचा बळी!



। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

इस्रायल आणि हमासमधील युद्ध अद्याप चालू आहे. गाझामध्ये लपलेल्या हमासच्या दहशतवाद्यांना शोधण्यासाठी इस्रायलने जंगजंग पछाडलं आहे. शुक्रवारी (२२ डिसेंबर) रात्री इस्रायलच्या वायूदलाने गाझामधल्या दोन घरांवर हवाई हल्ला केला. यामध्ये एकाच कुटुंबातील ७६ सदस्यांसह एकूण ९० पॅलेस्टिनी नागरिक मारले गेले. मदत आणि बचाव पथकांनी शनिवारी याबाबतची माहिती दिली आहे. या हल्ल्याच्या एक दिवस आधीच संयुक्त राष्ट्रांच्या प्रमुखांनी सांगितलं होतं की गाझामधील कोणतीही जागा सुरक्षित नाही. इस्रायलच्या सततच्या हल्ल्यांमुळे तिथे मानवतावादी मदत पोहोचवण्यात अडथळे येत आहेत. इस्रायली सैन्याने शनिवारी सांगितलं की, गेल्या आठवड्यात त्यांनी शेकडो कथित दहशतवाद्यांना अटक केली आहे. यापैकी २०० हून अधिक दहशतवाद्यांची चौकशी चालू आहे. हमास आणि इस्लामिक जिहाद या दहशतवादी संघटनांशी संबंधित ७०० हून अधिक लोक इस्रायलच्या तुरुंगांमध्ये कैद आहेत. दरम्यान, शुक्रवारी रात्री इस्रायलने गाजामधील दोन घरं भुईसपाट केली. यापैकी एक घर गाझा शहरात तर दुसरं नुसरत भागात होतं. गाझाच्या संरक्षण विभागाचे प्रवक्ते महमूद बासल यांनी सांगितलं की, गाझा शहरात झालेल्या हवाई हल्ल्यात अल-मुगराबी कुटुंबातील ७६ सदस्य मारले गेले आहेत. बासल यांनी या हल्ल्यात ठार झालेल्या लोकांची यादीदेखील जारी केली आहे.

# भारताचा झेंडा असलेल्या एमव्ही साईबाबा जहाजावर ड्रोन हल्ला

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**लाल समुद्रात भारताचा झेंडा असलेल्या एका जहाजावर ड्रोन हल्ला झाल्याचं प्रकरण काही तासांपूर्वी समोर आलं होतं. या हल्ल्याप्रकरणी अमेरिकेने मोठा दावा केला आहे. अमेरिकन लष्कराने म्हटलं आहे की, येमेनमधील हुती बंडखोरांनी या जहाजाला लक्ष्य केलं होतं. गॅबनच्या मालकीच्या या एमव्ही साईबाबा जहाजावर कोणतीही जीवितहानी झालेली नाही. परंतु, जहाजाने या भागात गस्तीवर असलेल्या अमेरिकेच्या युद्धनौकेला आपत्कालीन संदेश पाठवला होता.**

यूएस सेंट्रल कमांडने याबाबतची माहिती एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर शेअर केली आहे. या जहाजावर २५ भारतीय कामगार होते जे सुरक्षित असल्याचं भारतीय नौदलाने सांगितलं आहे.

### गुजरातच्या किनारपट्टीजवळ इराणचा हल्ला

» दरम्यान, या घटनेच्या काही तास आधी अरबी समुद्रात गुजरातच्या किनारपट्टीजवळ एका व्यापारी जहाजावर ड्रोन हल्ला झाला होता. या हल्ल्यामुळे स्फोट होऊन जहाजाच्या काही भागात आग पसरली होती. या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी आगीमुळे जहाजाचं मोठे नुकसान झालं आहे. या जहाजावर २० भारतीय कर्मचारी असल्याने भारतीय नौदलाने त्यांच्या सुरक्षेसाठी आपलं जहाज पाठवलं आहे. हा ड्रोन हल्ला इराणने केला असल्याचा दावा अमेरिकेच्या संरक्षण दलाने केला आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

इराणने अरबी समुद्रात भारताच्या एका जहाजावर हल्ला केल्यानंतर भारताचा झेंडा असलेल्या आणखी एका जहाजावर लाल समुद्रात हल्ला झाला आहे. त्यामुळे भारतीय नौदल सतर्क झालं आहे. दोन जहाजांनी लाल समुद्राच्या दक्षिणेकडे प्रवास करत असताना त्यांच्यावर हल्ला झाल्याची माहिती तिथे गस्तीवर असलेल्या अमेरिकन नौदलाच्या जहाजाला दिली होती. अमेरिकेने याबाबत एक्सवर माहिती शेअर केली आहे. त्यानुसार, लाल समुद्रात दक्षिणेकडे प्रवास करणाऱ्या एका जहाजावर नॉर्वेचा झेंडा होता, जे ब्लेमेनेनचं जहाज होतं. येमेनमधील हुती बंडखोरांनी उडवलेलं ड्रोन त्यांच्या जहाजावरून गेलं. तर एमव्ही साईबाबा या जहाजावर या ड्रोनने हल्ला केला.

अमेरिकन लष्कराने म्हटलं आहे की, एमव्ही साईबाबा हे जहाज गॅबनच्या मालकीचं आहे आणि त्यावर भारताचा झेंडादेखील आहे. या जहाजातून कच्चं तेल वाहून नेलं जात होतं. ड्रोन हल्ल्यामुळे जहाजावर कोणतीही जीवितहानी झालेली नाही.हल्ला झालेल्या या 'एमव्ही केम प्लूटो' जहाजावर लायबेरियाचा झेंडा होता आणि ते इस्रायलशी संलग्न होतं. हे जहाज ९ डिसेंबर रोजी कच्चं तेल घेऊन सौदी अरेबियातून कर्नाटकमधील मंगळूर बंदराच्या दिशेने निघालं होतं. २५ डिसेंबरपर्यंत हे जहाज मंगळूर येथे पोहोचणं अपेक्षित होतं. परंतु, गुजरातमधील वेरावळच्या नैऋत्येला २०० किलोमीटर आणि पोरबंदर किनाऱ्यापासून २१७ सागरी मैल अंतरावर समुद्रात या जहाजावर हवाई हल्ला झाला.

# मृणालनं विकत घेतली 2 कोटींची लक्झरी कार



बॉलीवूडच्या अनेक चित्रपटांतून ॲक्टींगचा जलवा दाखवणारी अभिनेत्री मृणाल ठाकूरने नुकतीच नवी लक्झरी कार विकत घेतलीय. मुंबईच्या एअरपोर्टवर मृणाल ठकूर तिच्या नव्या मर्सिडीज बेंज एस-क्लास 450सह झळकली. त्यानंतर तिच्या कारची चर्चा सोशल मीडियावर बघायला मिळतेय. मृणालच्या शानदार आणि पावरफुल लक्झरी सेडान कारची किंमत २ कोटी आहे. चला तर या कारचे जबदरदस्त फिचर जाणून घेऊया.एस-क्लास मर्सिडीज-बेंझची फ्लॅगशिप सेडान आहे, जी तिच्या प्रीमियम लुक आणि वैशिष्ट्यांसाठी ओळखली जाते. S - 350D हा MERCEDES BENZ S-CLASS चा बेस व्हेरिएंट आहे, जो 2925 CC, 6 सिलेंडर टर्बो-चार्ज्ड डिझेल इंजिनद्वारे ॲस्पिरेटेड आहे. हा व्हेरिएंट 281 BHP पॉवर आणि 600 NM पीक टॉर्क जनरेट करतो.

MERCEDES BENZ S CLASS 400D मध्ये 3 लीटर टर्बो चार्ज्ड डिझेल इंजिन आहे, जे 325 BHP पावर आणि 700 NM पिक टॉर्क जनरेट करते. मर्सिडीजच्या या व्हेरिएंटला ऑटोमॅटिक ट्रांसमिशनसह लॉंच करण्यात आलंय. यात 4MATIC सिस्टिमही आहे.

# लाखो मुलींचा क्रश असणारा अंकूश मात्र 'या' अभिनेत्रीवर फिदा..

अभिनेता अंकुश चौधरी मराठीतील चॉकलेट हीरो असं म्हटल्यास काही वावगं ठरणार नाही. पन्नाशी गाठलेली अंकुश तारुण्याच्या बाबतीत अगदी आताच्या हिरोंनाही तगडी टक्कर देतो. ॲक्शन हिरो असो किंवा रोमँटिक हिरो अंकुश सगळ्याच भुमिकेत शोभूनच दिसतो. त्याने आजवर 'डबल सीट', 'दगडी चाळ', 'ती सध्या काय करते', 'धुराळा' असे अनेक चित्रपट हीट केले आहेत.आता मात्र अंकुश एका नव्याकोऱ्या भुमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. 'महाराष्ट्र शाहीर' चित्रपटात तो शाहीर साबळे यांची भुमिका साकारत आहे. महाराष्ट्र शाहीर' या चित्रपटातुन तो त्याच्या आयुष्यातील बायोपिक सिनेमा करत आहे.

त्याच्या 'महाराष्ट्र शाहीर' या चित्रपटाला प्रेक्षकांचाही चांगल्याप्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. याच निमित्ताने अंकुश चौधरीशी सकाळ मनसोक्त गप्पा मारल्या आहे. नुकतच अंकुशने सकाळ डिजिटलच्या unplugged पोडकास्टच्या निमित्ताने अनेक गोष्टींचा खुलासा केला आहे. अंकुश चौधरी हा सुरवातीपासूनच एका चॉकलेट बॉयच्या भुमिकेत दिसला आहे. त्याचे चित्रपट पाहिल्यानंतर मुली त्याच्या प्रेमात पडतात. त्याच्या चाहत्यांची संख्याही अफाट आहे. तो नेहमीच मुलींच्या मनावर राज्य करतो. मात्र त्याच्या मनावर राज्य करते ती एकच त्याची बायको अभिनेत्री दिपा परब. मात्र ज्यावेळी अंकुशला त्याच्या क्रश बद्दल विचारलं याबाबत त्यावेळी त्याने खुलासा केला.



# सारा अली खान बिचारी तर..!

प्रसिद्ध अभिनेता आणि समीक्षक कमाल रशीद खान उर्फ केआरके अनेकदा त्याच्या ट्वीटमधून चर्चेत अस्तप. त्याने बऱ्याच ट्वीटमधून बॉलिवूड स्टार्सची खिल्ली उडवली आहे. यामुळे तो अनेकवेळा कायद्याच्या कचाट्यातही सापडला आहे. असे असूनही केआरके अशी वादग्रस्त ट्वीट करतच असतो. सध्या त्याने बॉलिवूड अभिनेत्री सारा अली खानवर निशाणा साधला असून आपल्या ट्वीटमध्ये साराची खिल्ली उडवली आहे.

सोशल मीडियावर सक्रिय असलेल्या केआरकेने सारा अली खानबद्दल आपल्या ट्विटमध्ये लिहिले, “बघा, वाईट वेळ कोणावरही येऊ शकते, जशी आत्ता सारा अली खानवर आली आहे! आज या बिचारीला कुणीही चित्रपटात घेत नाही त्यामुळे बिचारीने शहनाजच्या शोमध्ये भाग घेतला आणि समीक्षकही झाली. आता ती जाड्या आशिष चंचलानीबरोबर चित्रपटांचे प्रमोशनही करत आहे! बिचारीची कीव करावीशी वाटते.”केआरकेचं हे ट्वीट चांगलंच व्हायरल झालं आहे. यामध्ये त्याने प्रसिद्ध युट्यूबर आशिष चंचलानीवरही अत्यंत अभद्र भाषेत टीका केली आहे. केआरकेच्या या ट्वीटवर बरीच लोक टीका करताना दिसत आहेत. याआधीही केआरके अशा बऱ्याच ट्वीटमुळे चर्चेत आला होता.

नुकत्याच आलेल्या सलमान खानच्या ‘किसी का भाई किसी की जान’बद्दलही केआरकेने अशीच ट्वीट करत खूप टिंगल केली होती. हा चित्रपट ७-९ कोटींचा गल्ला करेल असं त्याने म्हंटलं होतं, तर या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर १०० कोटींहून अधिक कमाई केली. सारा अली खान सध्या आदित्य रॉय कपूरसह ‘मेट्रो इन दिनो’ या चित्रपटाच्या चित्रीकरणात व्यस्त आहे. हा चित्रपट ८ डिसेंबरला चित्रपटगृहात



# प्रभासच्या 'सालार'पुढे शाहरुख खानच्या 'डंकी'ने टेकले गुडघे!

२०२३ हे वर्ष शाहरुख खानसाठी धमाकेदार ठरले. मात्र वर्षाच्या शेवटी किंग खानला मोठा धक्का बसला आहे. त्याच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'डंकी' सिनेमाच्या आकडेवारीवर शाहरुख किंवा त्याचे चाहतेही नाखूश असतील. शाहरुखने 'पठाण' आणि 'जवान'मधून जी जादू निर्माण केली होती, ती यावेळी 'डंकी'च्या माध्यमातून पाहायला मिळाली नाही. 'जवान'ने पहिल्या दिवशी जितकी कमाई केली होती, तितकी 'डंकी'ला तीन दिवसातही करता आली नाही. राजकुमार हिरानी दिग्दर्शित 'डंकी'ने तिसऱ्या दिवशी म्हणजे शनिवारी किती कलेक्शन केले, घ्या जाणून.

बॉक्स ऑफिसवर 'डंकी'ची सुरुवात नक्कीच चांगली झाली होती पण सिनेमा बंपर कमाई करण्यात अपयशी ठरला. पहिल्या वीकेंडलाही चित्रपटाला कमाई करता आली नाही. चित्रपटाच्या कमाईची सुरुवात जरी दुहेरी अंकात झाली असली तरी 'पठाण', 'जवान' किंवा हल्लीच प्रदर्शित झालेल्या 'ॲनिमल'सारख्या चित्रपटांपेक्षा 'डंकी' खूपच मागे आहे. 'डंकी'ने बॉक्स ऑफिसवर पहिल्या दिवशी २९.२ कोटींची कमाई केली होती. जगभरात या सिनेमाने आतापर्यंत १०३ कोटी रुपयांची कमाई केली आहे.

### 'सालार'समोर 'डंकी'ने टेकले गुडघे

शाहरुख खानचा चित्रपट संथ गतीने कमाई करत असताना प्रभासने मात्र जबरदस्त कमबॅक केले. 'सालार'ने देशात ९० कोटी रुपयांसह आपले खाते उघडले होते आणि दुसऱ्या दिवशीची कमाई 'डंकी'च्या दुप्पट होती. SACNILK त्या रिपोर्टनुसार दुसऱ्या दिवशी 'सालार'ने ५९.३२ कोटींची कमाई केली आहे. एकंदरित दोनच दिवसात सालारची कमाई १५० कोटींच्या घरात पोहोचली आहे.

### कमबॅकपूर्वी शाहरुख खानची होती अशी अवस्था

'जवान' आणि 'पठाण' सोडले तर त्याआधी शाहरुख खानचा 'झिरो' सिनेमा २०१८ मध्ये रिलीज झालेला. या सिनेमानेही अपेक्षित कमाई केली नव्हती. आनंद एल राय दिग्दर्शित या चित्रपटाने देशात ९७ कोटी आणि जगभरात १७८ कोटींचा व्यवसाय केला होता.






# नवी WFI अखेर बरखास्त!

## क्रीडा मंत्रालयाची मोठी कारवाई, अध्यक्ष संजय सिंग यांना केले निलंबित

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारतीय कुस्ती महासंघावर क्रीडा मंत्रालयाने मोठी कारवाई केली आहे. भारतीय कुस्ती महासंघाच्या नुकत्याच च्या निवडणुका झाल्या, ज्यामध्ये बृजभूषण शरण सिंह यांचे निकटवर्तीय संजय सिंह विजयी झाले. संजय सिंग भारतीय कुस्ती महासंघाचे नवे प्रमुख बनले. मात्र, यानंतर प्रचंड गोंधळ उडाला. पैलवानांनी खूप विरोध केला असून दुसरीकडे, ब्रिजभूषण आणि संजय सिंग यांनी कुस्तीपटूंविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया देणे सुरूच ठेवले. पण आता क्रीडा मंत्रालयाने WFI वर मोठी कारवाई केली आहे. त्यांनी भारतीय कुस्ती महासंघालाच निलंबित केले आहे.**



या निलंबनानंतर संजय सिंह यापुढे अध्यक्षपदी राहू शकणार नाहीत. सध्या सरकारने युनियनच्या सर्व निर्णयांना स्थगिती दिली आहे. संजय सिंग यांची नुकतीच WFI च्या अध्यक्षपदी निवड झाली होती. त्यांना निवडणुकीत ४० मते मिळाली.

### सरकारने WFI ची नवीन संस्था निलंबित

क्रीडा मंत्रालयाने भारतीय कुस्ती महासंघाच्या नव्या संस्थेला निलंबित केले आहे. संजय सिंग यांची मान्यता रद्द करण्यात आली आहे. यामागचे मुख्य कारण म्हणजे डब्ल्यूएफआयच्या नवीन संस्थेचे संपूर्ण नियंत्रण जुन्या लोकांच्या हातात असल्याचे मानले जात आहे, जे की क्रीडा संहितेची अवहेलना आहे. राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कुस्तीपटूंना पुरेशी सूचना न देता आणि WFI घटनेतील तरतुदींचे पालन न करता ही घोषणा घाईघाईने करण्यात आली आहे. WFI घटनेच्या प्रस्तावनेच्या कलम ३ (ई) नुसार, WFI चे उद्दिष्ट इतर गोष्टींबरोबरच कार्यकारी मंडळाने निवडलेल्या ठिकाणी UWW नियमांनुसार वरिष्ठ, ज्युनियर आणि सब ज्युनियर नॅशनल चॅम्पियनशिपचे आयोजन करणे हे आहे. २१ डिसेंबरला WFI चे संपूर्ण पॅनल निवडून आले, ज्यामध्ये संजय सिंह अध्यक्ष म्हणून निवडले गेले.

यानंतर पत्रकार परिषदेत रडत रडत महिला कुस्तीपटू साक्षी मलिकने कुस्तीतून निवृत्ती जाहीर केली. त्यानंतर बजरंग पुनियानेही पद्मश्री पुरस्काराचा त्याग केला. कुस्ती महासंघाच्या निवडणुकीत बृजभूषण सिंह यांचे निकटवर्तीय संजय सिंह यांच्या नेतृत्वातलं पॅनेल जिंकलं. त्यामुळे साक्षी मलिकने निराश होऊन कुस्तीला कायमचा रामराम करण्याचा निर्णय घेतला होता.

### साक्षी मलिक निवृत्ती मागे घेणार?



» क्रीडा मंत्रालयाने कुस्ती महासंघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष संजय सिंह यांना निलंबित केलं आहे. तसेच त्यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारिणी बरखास्त केली आहे. या निर्णयाचं कुस्तीपटूंकडून स्वागत होत आहे. संजय सिंह यांची अध्यक्षपदी निवड झाल्यामुळे नाराज झालेल्या कुस्तीपटूंनी या निर्णयावर समाधान व्यक्त केलं आहे. संजय सिंह अध्यक्ष झाल्यामुळे भारताची ऑलिम्पिक पदकविजेती कुस्तीपटू साक्षी मलिक हिने कुस्तीला कायमचा रामराम केला होता. तिनेदेखील केंद्र सरकारच्या या निर्णयावर प्रतिक्रिया दिली आहे. २१ डिसेंबर रोजी झालेल्या कुस्ती महासंघाच्या निवडणुकीत संजय सिंह हे ४७ पैकी ४० मतं मिळवली आणि ही निवडणूक जिंकत ते भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष झाले होते. संजय सिंह हे कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांचे जवळचे सहकारी आहेत. बृजभूषण शरण सिंह यांच्यावर अनेक महिला कुस्तीपटूंनी लैंगिक अत्याचाराचे आरोप करत आंदोलन केलं होतं. या आंदोलनानंतर बृजभूषण यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याव्यतिरिक्त सरकारने कोणतीही मोठी कारवाई केली नाही. केवळ त्यांना कुस्ती महासंघाची निवडणूक लढण्यास मज्जाव केला.

---

# स्मृती मानधनानं धोनी स्टाइलमध्ये मॅच संपवली!

## टीम इंडियाचा ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय; रचला इतिहास

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी पार पडली. भारतानं या कसोटीत ऑस्ट्रेलियावर ८ विकेटने विजय मिळवत इतिहास रचला. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्या महिला क्रिकेट टीमच्या कसोटी सामन्याला मुंबईकर प्रेक्षकांचा देखील चांगला प्रतिसाद मिळाला. आस्ट्रेलियाच्या महिला संघानं भारतीय महिला संघापुढं ७५ धावांचं आव्हान ठेवलं होतं. मराठमोळ्या स्मृती मानधना हिनं महेंद्रसिंग धोनी स्टाइलनं शॉट मारत विजय मिळवला.**



ऑस्ट्रेलियानं पहिल्या डावात सर्वबाद २१९ धावा केल्या होत्या. त्यानंतर खेळताना भारताच्या पहिल्या डावात सर्वबाद ४०६ धावा झाल्या होत्या. भारताकडून स्मृती मानधना हिनं ७४, रिचा घोष ५२, जेमिमा रॉड्रिग्ज ७३, दिप्ती शर्मा ७८, पूजा वस्त्राकार हिनं ४७ धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियाच्या महिलांचा संघ दुसऱ्या डावात २३३ धावांवर बाद करण्यात भारतीय गोलंदाजांना यश आल्यानं अवघं ७५ धावांचं आव्हान मिळालं होतं.

पहिल्या डावात ७४ धावांची खेळी करणाऱ्या स्मृती मानधना हिनं दुसऱ्या डावातही नाबाद ३८ धावांची खेळी केली. तिनं भारताच्या विजयावर धोनीच्या स्टाइलमध्ये बॉलरच्या डोक्यावरुन मोठा फटका मारुन विजय मिळवला. भारताला ४ धावा हव्या असताना तिनं मोठा फटका लगावत विजय साकारला.

### टीम इंडियाचा ऑस्ट्रेलियावर पहिला विजय

भारतीय महिला संघ आणि ऑस्ट्रेलियाचा महिला संघ यांच्या संघात यापूर्वीपर्यंत १० कसोटी सामने पार पडले आहेत. त्यामध्ये सहा सामने अनिर्णित राहिले. तर चार सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियानं विजय मिळवला होता.

### टीम इंडियाची दमदार कामगिरी

» नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर झालेल्या इंग्लंड विरोधातील कसोटी सामन्यात भारताच्या महिला संघानं विक्रमी विजय मिळवला होता. आस्ट्रेलिया विरुद्धच्या कसोटीत देखील अशीच कामगिरी टीम इंडियानं कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्या नेतृत्त्वात करुन दाखवली आहे. टीम इंडियाच्या खेळाडू स्नेह राणा, पूजा वस्त्राकार आणि दिप्ती शर्मा, राजेश्वरी गायकवाड, हरमनप्रीत कौर यांच्या आक्रमक गोलंदाजीमुळं ऑस्ट्रेलिया कमी धावसंख्येवर रोखण्यात दोन्ही डावात यश आलं. टीम इंडियानं सांघिक कामगिरीच्या जोरावर हा ऐतिहासिक विजय मिळवला.